**नि. मु. कं. १३८/२०२४**
**नलिनी वि. प्रमोद**
**निशाणी १६ खाली**

**<u>वादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ नलिनी विठ्ठल शेळके हिची उलटतपासणी शपथेवर पुढे सुरू</u> — <u>प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. आर. खोकले यांच्यामार्फत.</u>**

मी प्रतिवादीला ओळखते. विठ्ठल शेळके यांच्यासोबत माझे लग्न झाले तेव्हा मला विठ्ठल शेळके यांचा माझेसोबत पुनर्विवाह आहे याची मला माहिती होती. माझा विठ्ठल शेळके यांच्यासोबत विवाह दि. ०२/०८/८५ रोजी झाला. हे म्हणणे खरे नाही की, मी विठ्ठल शेळके यांच्याकडे नांदायला गेली तेव्हा प्रतिवादी हा विठ्ठल शेळके यांचेकडेच राहत होता. प्रतिवादीचा ताबा त्याच्या आईने न्यायालयीन प्रक्रियेने मिळवलाबाबतचा माझ्या नोटीसमधील मजकुर बरोबर आहे. सदर न्यायालयीन प्रक्रियेतील ताब्याबाबतचा आदेश मी अभिलेखावर दाखल केलेला नाही. माझे कुटुंबात माझे पती विठ्ठल शेळके यांच्या उत्पन्नाशिवाय आम्हाला उत्पन्नाचा दुसरा स्त्रोत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती मोलमजुरी करतात. माझ्या सास—याचे संपुर्ण नांव श्रीराम मोतीराम शेळके असुन सासुचे नांव शांताबाई श्रीराम शेळके असे होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे सासु—सासरे यांचेकडे वाद मिळकती व्यतिरीक्त इतर कोणतीही मिळकत नव्हती.

२. हे म्हणणे खरे आहे की, माझी सासु शांताबाई मयत झाल्यानंतर माझ्या दोन नणंदा, एक दिर व माझे पती यांच्या नावे फेरफार नोंद झाली. माझी सासु शांताबाई यांच्याकडे वाद मिळकत कशी आली याबाबत दस्त मी अभिलेखावर दाखल केलेला आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकत शांताबाई हिच्याकडे कशी आली हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दोन नणंदा, एक दिर व पती यांनी मला दि. ०१/०७/२०१० रोजी वाद मिळकत विकली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकत माझ्या दोन नणंदा, एक दिर व पती यांची वडिलोपार्जित मिळकत होती. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकत विकत घेण्यासाठी मला रक्कम माझ्या पतीने दिली होती.

३. मी सध्या अकोला येथे राहते. मी अकोला येथे ज्या मिळकतीत राहते तिचा मालमत्ता क्रमांक मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी अकोला येथे ज्या घरात राहते ते घर माझ्याच नावाने आहे. मी प्रतिवादी प्रमोदच्या नावाने तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने माझ्याकडे हिस्सा मागु नये म्हणुन मी सदरची तक्रार दिली होती.

४. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकत श्रीराम शेळके यांच्या नावाने होती. साक्षीदार पुन्हा सांगते की, वाद मिळकत माझ्या सासुबाईच्या नावाने होती. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीत प्रतिवादीला हिस्सा मिळु नये यासाठी मी प्रस्तुत दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या नावाने केवळ वाद मिळकतीचा ७/१२ उतारा असुन प्रत्यक्ष ताबा प्रतिवादीकडे आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीला हिस्सा मिळु नये म्हणुन मी दि. ०१/०७/२०१० रोजीचे खरेदी खत करून ठेवलेले आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. २३.१२.२०२५ (ए.ए. माळी)

अकोट २रे सह दिवाणी न्यायाधीश,

अकोट, ता. अकोट जि. अकोला.